१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४
अंक – १ ला

# दातार कुलवृत्त

संपादक : कविता कुलकर्णी दातार

# संपादकिय...



## वाचन संस्कृती जपण्यासाठी ...

'वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला किती समर्पक आहे, हे आपण सर्वच जाणतो; लोकमान्य टिळकांनी देखील 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा ' असे म्हंटले आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात मुद्रित पुस्तकांबरोबरच वाचनाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. किंडलवर, महाजालावरील विविध साईट्स आणि ॲप्सवर डिजिटल आणि ऑडियो स्वरुपात विविध भाषेतील आणि विविध विषयांवरील असंख्य वाचनसामग्री उपलब्ध आहे. पण म्हणतात ना, 'सहज उपलब्ध असलेल्या गोष्टींचे महत्त्व उरत नाही.'

माझ्या लहानपणी अमर चित्रकथा, चंपक, चांदोबा, किशोर इ. लहान मुलांमुलीं साठीची किंवा किशोरवयीन मुलांमुलीं साठीची पुस्तकं/मासिकं फार लोकप्रिय होती. आईवडील महिनाभरात त्यापैकी एखाद दुसरे मासिक किंवा पुस्तक विकत घेऊन देत. मग ज्या मित्र मैत्रिणीकडे आपल्याकडील पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके असतील त्यांच्याशी अदलाबदली चालायची किंवा वाचनालयातून पुस्तकं, मासिके आणून वाचली जायची. स्वतः कमवायला लागल्यावर ऐतिहासिक, वैचारिक, सामाजिक, तंत्रज्ञानविषयक आणि मानसशास्त्र विषयक चिक्कार पुस्तकं मी स्वतः वाचण्यासाठी आणि भेट देण्यासाठी विकत घेतली. कुठे पुस्तक प्रदर्शन लागले की त्यातून किमान पाच सात पुस्तके तरी विकत घ्यायची हा आमच्या आणि आधीच्या पिढीतील वाचनप्रिय लोकांचा परिपाठच होता.

पुढे अभ्यासातील आणि नंतर कामांतील व्यस्ततेमुळे वाचनाला पुरेसा वेळ मिळेनासा झाला. पण थोड्या प्रमाणांत का होईना वाचनाची सवय कायम

(पान नं. ४ वर)

### CHAIRMAN'S APPEAL

# 50 Golden Years of Datar Kulvrutant

DATAR KULVRUTANT was initiated by our forefathers' way back in 1972 onwards.

The Vision and mission of the Datar Kulvrutant was to foster collaboration, loyalty, and mutual support among its members. Building a clan, whether in a traditional sense or within a modern organizational context, is fundamentally about creating a strong, cohesive group that shares common values, goals, and a sense of belonging while recognizing the talent, expertise and experiences among Datars .

The visionaries, namely (Editors : Shri. Shridhar Hari Datar, Shri. Dattatray Vasudev Datar , Shri Balkrishna Narayan Datar and Publication Committee : Shri. Manohar Chintaman Datar, Shri. Shivram Keshav Datar) are to be appreciated and respected for this herculean task of building and referring to the rich history and heritage of Datars. It took almost two and half years to publish the Kulvrutant, The 24th March 1974 was the publication date. (Gudi Padva day).

The Glorious golden 50 Years of Datars need to be acknowledged, appended and recreated with future generation in mind. The Advent of technology has certainly contributed in terms of understanding and collating the huge Information, data leading to Knowledge. Knowledge unless managed and made available with ease by adding value has to be in the forefront.

DATAR KUL MANDAL therefore has its focus to utilize and plan a KNOWLEDGE BASE for and among Datars which should come a long way in appreciating and sharing our community and its values

We therefore are embarking on a very ambitious project to gather Value based Information of Datars

**Fostering a Sense of Belonging and Identity :** To provide its members with a sense of identity and belonging. This is crucial for individual well-being and can significantly enhance the collective strength of the group.

In a clan culture, individuals bond over shared ancestry or common organizational goals, creating a familiar atmosphere that nurtures loyalty and engagement1.

**Enhancing Collaboration and Teamwork :** Strong teamwork and active participation from every group member. This collaborative spirit drives innovation and problem-solving, leveraging the collective wisdom to tackle challenges and achieve shared objectives.

**Promoting Engagement and Well-being :** Members should feel connected to their colleagues and the organization, which motivates them to contribute their best efforts towards the community at large.

**Improving Communication and Reducing Misunderstandings :** Open and transparent communication is a hallmark of clan cultures. The typical social and community experience of understandings needs to be fostered .

**In summary, building a clan is about more than just assembling a group of people; it's about creating a community that shares a deep connection, whether through bloodline, cultural heritage or organizational mission. It's a powerful way to unite individuals and harness their collective potential for greater good and common purpose .**

**The objective of Kulvrutant and Information gathering lies in its ability to foster collaboration, loyalty, and mutual support among its members .**

With this Vision and a mission , I as the Chairman of The Datar Kul Mandal is appealing to you all to kindly be a part of this thought process and action plan to promote and be a proud Datar.

**- Dhananjay Vijay Datar**
Chairman
(DATAR KULMANDAL )

# दातार कुल मंडळ बातमीपत्र

नमस्कार मंडळी. दातार कुल मंडळामध्ये आपले सहर्ष स्वागत आहे. कुलमंडळ स्थापनेचे हे सहावे वर्ष आहे. आज आम्हाला आपणास सांगण्यास आनंद होतो की मंडळाचे १० फाउंडर मेंबर., ६१ आजीवन सदस्य आणि ३८ वार्षिक-द्विवार्षिक-पंचवार्षिक सभासद आहेत. सर्व दातार कुलबंधूंनी कुलमंडळाच्या बाबतीत जो विश्वास दाखवला त्याबद्दल कुलमंडळ सर्वांचेच कायम ऋणी आहे. मागील पाच वर्षात कुलमंडळाने पुणे, ठाणे, पेण आणि नाशिक अशा चार ठिकाणी कुलसंमेलने आयोजित केली आणि या सर्व कुल संमेलनांना कुलबंधूंचे आणि भगिनींचे उत्तम सहाय्य मिळाले.

दातारकुल मंडळ न्यासाची पहिली कमिटी आपली पाच वर्षे मुदत पूर्ण करून डिसेंबर २०२३ मध्ये निवृत्त झाली. कुलमंडळाच्या MOA प्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. जानेवारी २०२४ मध्ये नवीन कमिटी स्थापन झाली. नवीन कमिटी मधील विश्वस्त आणि पदाधिकारी यांची नावे पुढीलप्रमाण.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. धनंजय विजय दातार | विश्वस्त, अध्यक्ष |
| २ | श्री. मुकुंद राजाराम कुलकर्णी | विश्वस्त, उपाध्यक्ष |
| ३ | श्री. राजीव श्रीपाद आघारकर | विश्वस्त, सचिव |
| ४ | श्री. श्रीराम वासुदेव दातार | विश्वस्त सहसचिव |
| ५ | श्री. मंदार विजय दातार | विश्वस्त खजिनदार |
| ६ | श्री. कमोडोर हर्षद लक्ष्मण दातार | सदस्य |
| ७ | श्री. व्यंकटेश अशोक दातार | सदस्य |
| ८ | श्री. व्यंकटेश श्रीधर दातार | सदस्य |
| ९ | श्री. नीलकंठ वामन दातार | सदस्य |
| १० | श्री. पराग दातार | सदस्य |
| ११ | श्री. किरण दातार | सदस्य |

नवीन कमिटीने कार्यभार स्वीकारल्यापासून मंडळाच्या उपक्रमांना काहीशी चालना मिळाली. त्यायोगे काही नवीन लोकांना एकत्र घेऊन उपसमिती स्थापन करण्याचे ठरवण्यात आले.

दातारकुलातील विविध कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी श्री. राजेश दातार, सौ. मधुरा टापरे आघारकर व सौ. शिल्पा दातार या तिघांची सांस्कृतिक समिती स्थापन झाली. उभरत्या, इच्छुक कलाकारांनी आपल्या कलेचे सादरीकरण करण्यासाठी सांस्कृतिक समितीशी संपर्क साधावा.

कविता कुलकर्णी दातार या दातार कुलमंडळाच्या वतीने इ- न्यूज लेटर तयार करून ते चतुर्मासिक प्रसिद्ध करतील. या न्यूज लेटर मध्ये आपल्या कुळातील लेखकांना एक व्यासपीठ निर्माण करून दिले जाईल.

सध्याचे युग हे संगणकीय युग आहे, त्यामुळे लोकांशी वेगाने संपर्क साधण्यासाठी दातार कुलमंडळाची वेबसाईट असणे अत्यंत आवश्यक होते.

आपल्याच कुळातील एक नवयुवक श्री सिद्धांत दातार यांनी वेबसाईट विषयी मार्गदर्शन करण्याचे आणि प्रत्यक्ष काम करण्याचे कबूल केले. ही वेबसाईट आपण पुढील संकेतस्थळावर पाहू शकता.www.datarkulmandal.com.

कुलमंडळाचे उपक्रम आणि कुलमंडळातील व्यक्तींचे विशेष सर्वांपर्यंत त्वरित पोहोचावेत यासाठी श्री अक्षय दातार हे डिजिटल मार्केटिंग करण्यासाठी कुलमंडळाबरोबर जोडले गेले आहेत.

श्री हृषिकेश दातार आणि श्री शेखर आघारकर यांच्या मदतीने श्री पराग दातार यांच्या नेतृत्वाखाली एक व्यवसाय समूह स्थापन करण्यात आला आहे.

कुलमंडळाने २०२४ मध्ये घेतलेल्या मुख्य उपक्रमांपैकी एक म्हणजे पद्मश्री डॉक्टर श्रीकांत दातार (डीन हार्वर्ड बिझनेस स्कूल) यांचे ऑनलाईन वेबिनार. हा उपक्रम सर्व सभासदांना अत्यंत मार्गदर्शक असा वाटला.डॉक्टर श्रीकांत दातार हे देखील आपल्या कुलबंधूंना भेटून अत्यंत आनंदित झाले.

डॉ. स्मिता दातार यांनी लिहिलेल्या पद्मश्री पं. डी. के. दातार यांच्या चरित्राला, उत्कृष्ट चरित्रासाठी **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्य अकादमी लातूर, राज्यस्तरीय, प्रथम पुरस्कार'** लाभला आहे. त्यांच्या 'अयोध्येची उर्मिला' कादंबरीला देखिल अतिशय मानाचा **'सूर्यांश साहित्य आणि सांस्कृतिक मंच चंद्रपूर, पुरस्कार'** लाभला आहे.




अभिनेत्री गायत्री दातारने **'तुला पाहते रे'** या झी मराठीवरील मालिकेतून मालिकाविश्वात पदार्पण केलं होतं. सुबोध भावे यांच्यासोबतची तिची ही मालिका खूप गाजली होती. त्यानंतर स्टार प्रवाहवरील **'सुख म्हणजे नक्की काय असतं'** या मालिकेत काम केलं होतं. या बरोबरच कलर्स मराठीवरील **'बिग बॉस मराठी सीजन ३'** मध्येही गायत्री सहभागी झाली होती. सध्या ती कलर्स मराठी वाहिनीवरील **'अबीर गुलाल'** या मालिकेत काम करत आहे.






अभिनेत्री गार्गी दातारने वयाच्या ७ व्या वर्षी तिच्या अभिनय प्रवासाला सुरुवात केली होती. तिने बाल कलाकार म्हणून १५ हून अधिक हिंदी जाहिराती आणि ५ पेक्षा जास्त मराठी चित्रपटांसह ३ हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. लेक असावी तर अशी' हा तिचा नुकताच रिलीज झालेला विजय कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपट आहे.




सुमेधा दातार या सुप्रसिद्ध अभिनेत्री, यांनी देखील कलर्स मराठीवरील नवीन मालिकेत नाट्यमय प्रवेश केला आहे.


दातार कुलमंडलातील ज्येष्ठ सदस्य श्री. विलासजी दातार यांची भारतीय जनता पार्टी - सांस्कृतिक विभाग- ज्येष्ठ नागरिक आघाडी - पुणे शहर उपाध्यक्षपदी व भारत विकास परिषदेच्या सारसबाग, पुणे शाखेच्या समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत भारत विकास परिषद दिव्यांग व्यक्तींसाठी कार्यरत असून, गरजूंना जयपूर फूट मिळवून देण्यात आघाडीवर आहे.

कुलमंडलातील सदस्य श्री. प्रशांत मुकुंद कुलकर्णी यांची भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र सांस्कृतिक प्रकोष्ठच्या पुणे शहर सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. प्रशांतजी सांस्कृतिक व सिनेक्षेत्रात कार्यरत आहेत.

कुलमंडळाने यावर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ जुलै २०२४ रोजी डेक्कन जिमखाना पुणे येथे आयोजित केली होती. या सभेस ३५ सभासद उपस्थित होते. या सभेमध्ये सर्व विषयांबरोबरच कुलवृत्तांत तयार करणे आणि त्यासाठी लागणाऱ्या तयारीचा आणि आर्थिक खर्चाचा सर्व सभासदांना अंदाज देण्यात आला. कुलवृत्तांत २.० प्रकल्पाचे नियोजन केले जात आहे. तपशील लवकरच जाहीर केला जाईल. सदस्य श्री. अक्षय दातार, श्री. नितीन दातार, श्री. संजय दातार आणि श्री. शंतनू दातार यांनी आवश्यक माहिती तंत्रज्ञानाच्या दृष्टीने आपला पाठिंबा देऊ केला आहे.

कुलमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आजीवन सभासदांना सभासदत्व प्रमाणपत्र देण्यात आले. ज्यांनी प्रमाणपत्र घेतले नाही त्यांनी सचिव किंवा उपसचिवांशी संपर्क साधावा.

# Here With Some Hope




*(Here with some hope, I am trying to make a creation of whatever I have faced, am facing and will be facing....*
*An elder teenager's canvas about life, always under editing process in his/her mind....)*

With thousands of hopes in the heart and no plan in mind,
One lively creature is going to enter in the world outside.

He has almost nothing, to face the unknown world before him
But has one thing enough of all; his strong and wise dreams.

With all the desires and fascinations, a journey he starts
From a secured place to the unknown world, with confidence; he departs.

The only thought in his mind is to fight and win,
To show the world how he rises from what he has been.

He fails, he falls and feels the whole world opposing him
But he never does give up or lose hope, for his desperate dream

-Saee Shriram Datar

**DATAR & SONS NEWSPAPERS DISTRIBUTORS PVT. LTD.**

**Thane Office**
Phatak Wada, Opp. Wadiya Hospital,
Tembhi Naka, Thane (W)- 400602
Ph : 253 44 327/254 35 620

**Mumbai Office**
Mahendra Chember, Near New Empire Talkies,
V.T. Mumbai- 400001.
Ph : 220 34 327

(पान नं. १ वरून)

होती. मात्र स्मार्टफोन हातात आल्यानंतर बहुतेकांच्या वाचनाला खीळ बसली. कामाचे तास संपल्यावरचा किंवा सुट्टीच्या दिवसातला बहुतेक वेळ व्हॉट्सऍप, इन्स्टाग्राम वरचे मेसेजेस, फॉर्वर्डस आणि रील्स बघण्यात कसा संपायला लागला हे आपल्याला कळले देखील नाही. वाचन देखील व्हॉट्सऍप किंवा फेसबुकवर आलेल्या पोस्ट्पुरते मर्यादित राहू लागले.

मनुष्याला असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या सहाय्याने तो सुबुद्ध आणि प्रगल्भ तर होतोच; परंतु त्याच्या कार्यसंस्कृतीवर सुद्धा त्याचा प्रभाव पडतो. हे ज्ञान मिळवण्याचा किंवा वाढवण्याचा सोपा उपाय म्हणजे वाचन मग ते वाचन मुद्रित पुस्तकांचे (physical hardcopies) असो वा डिजिटल स्वरूपातील असो. जास्तीत जास्त केलेले वाचन लेखनकौशल्य प्राप्त करण्यासाठी देखील उपयुक्त ठरते. अलीकडच्या काळात आपल्या मोबाईल फोनवरील एका क्लिकवर जगातील कानाकोप-यात घडणा-या घटकांची अद्ययावत माहिती प्राप्त होते. जुन्या पिढीपाशी ही अद्ययावत साधने नसल्यामुळे जास्तीत जास्त वाचनातून ते आपली ज्ञान-लालसा भागवत असत.

ही वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी दातार कुलमंडळ प्रयत्न करत आहे, 'दातार कुलवृत्त' या पीडीएफ स्वरूपातील त्रैमासिकाच्या रुपाने 'दातार कुलवृत्त' चा पहिला अंक आपल्यापुढे सादर करताना विशेष आनंद होत आहे. आपल्या कुलमंडळातील सभासदांनी त्यांच्या स्वरचित कविता, लेख, अनुभव आणि कथांनी हा अंक सजवला आहे. विशेष म्हणजे या अंकातील काही साहित्य मराठी तर काही इंग्रजी मधे आहे. त्यामुळे मराठी अथवा इंग्रजी दोन्हींच्या वाचकांसाठी हा अंक उपयुक्त ठरेल. दातार कुलवृत्त' हा त्रैमासिक अंक आणि यातील साहित्य आपल्या ज्ञानात भर टाकेल आणि आपले नक्कीच मनोरंजन करेल अशी आशा करते.

– कविता कुलकर्णी दातार

# केल्याने देशाटन, पंडीत मैत्री, सभेत संचार

This depicts and insists on the importance of communication and connections.

Communications and connections is the current theme for Datar Kul Mandal….

it appears or rather observed, that Datars missed a connect and communicate approach during last few years .

How many of you can recollect or identify that when last time you connected on your own with any Datar (besides your relatives) beyond your sphere . Did you ever felt a need to reach out and try to understand about other Datars? where are they located, whats their expertise and experiences, their success and or failure stories, achievements and high positions they acquired ? I guess for most of us it did not matter. Unfortunate but True

Let's agree to disagree, may be, that we as Datars (Chitpavans) are certainly (mostly) self-centered with self-esteem. Is this a proud thing or is it a negative characteristic feature ?? World over among Indians, the observation is that certain communities are keen and committed for the social and cultural aspects, Gujaratis, Punjabis (Sikhs) and South Indians , their contribution towards their community is well known ,

We certainly miss this and we do tend to stay away from the social aspects. Funnily enough, Datars means doners/ givers, which certainly is missing .

Besides contributions or part of the social structure , The way we stay away and do not connect or comm-unicate among ourselves is and will be a thing accepted and recognized by all .

Recent sensitive issues being observed in India and abroad do indicate the serious repercussions and challenges in relation to survival of Hindus etc. The power of being together and being associated with each other offers a phenomenal and strong base .

As most of you will agree Communication is the heartbeat of human interaction. It is the tool that has the power to connect souls, forge alliances, and create a tapestry of shared experiences.

In a world teeming with diversity, communication is the magic wand that turns the ordinary into the extraordinary, enabling us to reach out and touch the lives of others, even those miles away.

At its core, communication is about connection. It's about understanding and being understood. It's the exchange of words, the sharing of emotions, and the transmission of ideas. Communication can take many forms - spoken, written, non-verbal, digital - each with its own nuances and power to influence.

**The Essence of Communication**

The essence of communication lies in its ability to transcend barriers. Whether it's bridging the gap between two people or connecting communities across continents, communication serves as a conduit for understanding. It's not just about conveying information; it's about creating a common ground where ideas can flourish and relationships can grow.

Effective communication is built on the pillars of clarity, empathy, and active listening. It's about expressing oneself clearly and respectfully, while also being open to the perspectives of others. When we communicate effectively, we foster an environment where trust and cooperation thrive.

**The Impact of Communication**

The impact of communication is far-reaching. On a personal level, it can strengthen bonds, resolve conflicts, and enhance self-expression. In the professional realm, it drives collaboration, innovation, and leadership. At its best, communication has the power to unite people, inspire movements, and change the world.

In today's digital age, communication has taken on new dimensions. Social media, instant messaging, and video conferencing have revolutionized the way we connect. These tools have made it possible to maintain relationships over long distances, collaborate in real-time, and share experiences with a global audience.

**Challenges and Opportunities**

Despite its power, communication also faces challenges. Misunder-standings, cultural differences, and technological barriers can hinder effective communication. However, these challenges also present opportunities for growth and learning. By embracing diversity and leveraging technology, we can enhance our communication skills and deepen our connections.

In conclusion, the power of communication is a testament to our shared humanity. It is what enables us to connect, understand, and progress. As we navigate the complexities of the modern world, let us harness the power of communication to build a more connected and compassionate society.

Do you think that Datar Kul mandal with its theme to connect and communicate is a way forward in ensuring a strong Bond among us ? we as Datars have so much to contribute, share and showcase our successes by holding each other's hand . We have stalwarts among us who are ready to offer their expertise, guiding hand and encourage-ment for all to succeed .

It' like a ladder. You are on a step, where you can reach out upwards seeking help while extending your help / support and extend a hand to pick someone from the step below you.

Is not it a part of communicate and connect ? lets ensure that we communicate and connect on a regular basis by offering a good hand holding and a strong shoulder to lean upon.

**- Dhananjay Vijay Datar**



# स्वातंत्र्यवीर सावरकर

## - एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

**– सौ.मिनल दातार आगाशे**

आज स्वातंत्र्यवीर सावरकरांची १४१ वी जयंती, मध्ये इतका काळ लोटला तरीही ह्या महापुरुषाच्या विचारांची, त्यांच्या शतपैलू गुणांची माझ्यासारख्या असंख्य सावरकरप्रेमींवर, अगदी लहानांपासून वृद्धांपर्यंत एक वेगळीच जादू आहे नाही ! स्वा. सावरकरांचे संपूर्ण चरित्रच प्रेरणादायी आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, वक्तृत्व, राष्ट्रनिष्ठा, त्यागवृत्ती, जाज्वल्य देशाभिमान हे सगळंच आपल्यासाठी प्रेरणादायी आहे.

खरं तर अशी प्रेरणादायी चरित्र शालेय अभ्यासक्रमात समाविष्टीत असायला हवीत त्याशिवाय पुढील पिढीला रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले ह्या उक्तीचा अर्थ आणि आता आपण जे स्वातंत्र्य उपभोगत आहोत ते कोणा कोणाच्या बलीदानानी मिळालंय कळणार कस?! येणाऱ्या पिढ्यांना किमान घरातील वडीलधार्यांनी गोष्टीरूप सांगायला हवे. आजकाल असे सिनेमे सुद्धा येतायंत जसे कि नुकताच रणदीप हुडा प्रदर्शित स्वातंत्र्यवीर सावरकर सिनेमा किंवा माझ्या व त्या आधीच्या पिढीने स्वरगंधर्व सुधीर फडके दिग्दर्शित वीर सावरकर सिनेमा पाहून जे काम पुस्तकांना करायला वेळ लागू शकतो ते कदाचित सिनेमा हे माध्यम जागृती वाढवण्याचे काम थोडे वेगानी करु शकते, अर्थात त्यांनी इतिहास जसा आहे तसाच दाखवला तर... !!!!

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हंटले कि त्यांच्या चरित्रातील पुढील प्रसंग झरझर डोळ्यासमोर येतात. त्यातील काही निवडक नमूद करीत आहे.

चापेकर बंधूंकडून प्रेरणा घेतलेल्या छोट्या विनायकाने अगदी कोवळ्या वयात आपल्या देवघरातील देवीसमोर घेतलेली देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची शपथ असो की पुण्यात विदेशी कपड्यांची होळी करण्यासाठी घेतलेला पुढाकार, वयाच्या सोळाव्या वर्षी घरात वडिलांना आणि धाकट्या भावाला प्लेग झाल्यावर घेतलेली संपूर्ण घराची काळजी असो, ब्रायटन च्या किनाऱ्यावर मातृभूमीच्या विरहात ने मजसी ने परत मातृभूमीला सागर प्राण तळमळला, हि आणि अशी अनेक काव्य लिहिणारे महाकवी सावरकर, जगप्रसिद्ध मार्सेलिस ची समुद्रातील उडी, अंदमानातील १२ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा असो अथवा हिंदू महासभेची स्थापना करून देशाला अखंड हिंदुस्थान निर्माण करण्याचा दिलेला महामंत्र असो, रत्नांगिरीत स्थानबद्धतेत असूनही पतित पावन मंदिराची स्थापना करून समाजातील सर्व स्तरातील लोकांसोबत सहभोजन कार्यक्रम करून केलेली समाजक्रांती असो सगळेच अद्भुत आणि प्रेरणादायी आहे. परंतु त्यातील २ प्रसंगांची निवड करून त्याचे विश्लेषण करण्याचा मी येथे प्रयत्न करत आहे.

### प्रसंग १ :

स्वा. सावरकरांना मुंबई न्यायालयात ५० वर्षे जन्मठेपेची, काळ्या पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली त्यानंतर ज्यावेळेस काही दिवस ते मुंबईतील डोंगरीच्या तुरुंगात होते. त्यांना एके दिवशी माई म्हणजे त्यांची पत्नी सौ. यमुनाबाई भेटावयास आल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या मध्ये जो अलौकिक संवाद घडला तो वाचताना कायम मन भरून येते तसेच ते अभिमानाने फुलून येते. असे थोर दाम्पत्य आपल्या ह्या भारत देशात होऊन गेले ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य यज्ञात आपल्या संसाराची हसत हसत आहुती दिली. 'ह्या आहुतींनी जर हजारो संसार फुलणार असतील तर त्यात आम्हास धन्यता आहे', असे उद्गार काढणाऱ्या, निस्वार्थ राष्ट्रप्रेम असलेल्या आपल्या पतीचा माईंना किती अभिमान वाटला असेल! स्वतःचा नाही तर देशाचा संसार करणारा पुरषोत्तम त्यांना पती म्हणून लाभला हे त्यांचे अहोभाग्य! 'यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्रीचा हात ' हे वचन माईंनी खरे करून दाखवले. पण खरंच हे विरहाचे दुःख पचवणे माईंसाठी सोपे होते का ? पण तात्यारावांनी किती छान उदाहरण देऊन त्यांची समजूत काढली. आणि केवढे मोठे तत्त्वज्ञान त्या २ ओळींतून ते जगाला सांगून गेले. 'काहीतरी पेरल्याशिवाय काही उगवत नाही वरून ज्वारीचं कणीसच्या कणीस उभं रहावं, असं जर वाटतं असेल तर एका कणसाच्या दाण्याला जमिनीत गाडून घ्यावं लागतं.' मला हा प्रसंग वाचताना प्रभू रामचंद्रांच्या वाट्याला आलेला १४ वर्षांचा वनवास आठवला. परंतु शेवटची एक दोन वर्ष सोडता सीतामाई नेहमीच त्यांच्या सोबत होत्या. परंतु इथे कदाचित पुढल्या जन्मीच भेट घडेल असेच वाटत होते कारण जन्मठेपेची शिक्षा होती. तरीही त्यांनी हे वास्तव स्वीकारलेले होते.

### प्रसंग २ :

स्वा. सावरकरांना मुंबई न्यायालयात ५० वर्षे जन्मठेपेची, काळ्या पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली त्यानंतर त्यांना अंदमानातील कारागृहात म्हणजे जणू नरकातच आणण्यात आले. तो संपूर्ण खडतर प्रवास, रोजच्या मरण यातना, हे सगळेच वाचताना, ऐकताना आपल्या अंगावर काटा येतो, डोळ्यातून घळाघळा अश्रू येतात पण त्यांनी ते सहन कसे केले असेल ह्याचा विचार करताना जाणवते, तात्यारावांनी ते प्रचंड आत्मबल, मनोधैर्य आणि काही योगसिद्धीच्या आधारे शक्य करून दाखवले. पुढील पिढयांना 'देशासाठी बलिदान देणे' म्हणजे काय असते ते कृतीतून दाखवलं. कितीही संकटे आली तरी त्यावर मात करून आपल्या ध्येयावर अढळ कसे राहायचे ह्याचे धडे त्यांनी आम्हाला दिलेत.

त्या आत्मबलाची प्रचिती अंदमानात जेल मध्ये प्रवेश करतानाच ठळकपणे जाणवते. म्हणजे असे की जेलमध्ये प्रवेश केल्या केल्याच समोर जेलर बॅरी उभा असतो आणि बोलाचालीत सावरकरांना म्हणतो की ; ' तुम्हाला ५० वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली आहे म्हणजे तुम्ही येथून जिवंत जाऊ शकणार नाही.' त्यावर सावरकर ज्यांचे हात पाय साखळदंडाने जखडले आहेत ते बॅरीला उलट प्रश्न विचारतात की; 'तुम्हाला असा विश्वास आहे का की ब्रिटिशांचे राज्य ५० वर्षे टिकेल?' केवढे हे आत्मबळ आणि केवढा दुर्दम्य आत्मविश्वास आपल्या देशबंधूवर! एका क्षणात बॅरीला त्यांनी आपल्या वाक्चातुर्याने पराभूत केले.

सरस्वती देवीचा वरदहस्त असलेल्या तात्यारावांनी अंदमानसारख्या नरकात सुध्दा कमला सारख्या खंड काव्याची निर्मिती केली. खरं तर ना कसली लिहिण्यासाठी सोय–सुविधा. तरीही भितींवर दगडांनी कोरून ते पाठ करायचे ह्या आशेवर की इथून बाहेर पडलो तर ते परत लिहिता आले पाहिजे. हे सगळे त्यांच्या चरित्रात वाचताना मनात विचार

आला, अरे मी एखाद दिवशी उपास करते त्यावेळेस किती चोचले असतात. जाऊदे आज उपास आहे तर जास्त कष्टाचे काम नको, डोक्याला त्रास नको द्यायला, आराम करू थोडा आज. पण ह्या तुरुंगात ज्यांना रोजच उपास घडत असे, त्यातून कष्टाची कामे...तरीही काव्यनिर्मिती होते? आराम हा शब्द तर तात्यारावांच्या शब्दकोशात तरी असेल का? हा लेख लिहिण्याआधी स्वातंत्र्यवीरांच्या चरित्राचे श्रवण, वाचन केले आणि कुठेतरी जाणीव झाली, प्रेरणा मिळाली की असे मनोधैर्य असेल तर काहीच अशक्य नाही.

अंदमानातील हालापेष्टांबद्दल आपण वाचलंय पण हे जाणून घेतल्यावर थक्क व्हायला होते की कोलू फिरवणे हे काम अतिशय कठीण आणि कष्टप्रद होते तरी स्वा. सावरकरांची तेच करण्याची तयारी असे कारण ते करताना त्यांना तिथे असलेल्या काही राजकीय बंद्यांशी बोलण्याची संधी मिळत असे. हाती घेतलेल्या उदात्त कार्याविषयी चर्चा झाल्यावर मन परत एकदा प्रफुल्लित होत असे. प्रतिकूलतेमध्ये अनुकूलता शोधण्याचा हा त्यांचा गुण त्यांनी त्यांच्या अश्या अनेक कृतींमधून दाखवून दिला आहे. जसे की, सगळ्या हालअपेष्टा सहन करताना सुद्धा जे कैदी निरक्षर आहेत त्यांना साक्षर कसे करता येईल ह्यासाठी प्रयत्न केले आणि ते यशस्वी करून दाखवले. शिवाय संघटनाचे काम जे देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वात महत्वाचे होते त्याची सुरवात अंदमानातील तुरुंगात केली.

हे संघटन यशस्वी होत आहे ह्याची अनुभूती त्यांना मिळाली जेव्हा लोकमान्य टिळकांच्या मृत्यूची बातमी त्या अंदमानच्या कारागृहात पसरली आणि सर्व शोकाकुल कैद्यांनी एकमताने त्यादिवशी भोजन घेतले नाही.

दुसरा आमूलाग्र बदल म्हणजे तात्यारावांच्या हिंदुत्ववादी विचारांनी प्रभावित आणि संघटित झालेल्या कैद्यांमध्ये सलाम ची जागा राम राम ने घेतली. ते ऐकमेकांना भेटले की पूर्वी जे सलाम म्हणायचे ते आता राम राम म्हणू लागले.

अशी हि अखंड हिंदुस्थान ची भावना ज्यांना संपूर्ण देशात रुजवायची होती ती सुरवात त्यांनी अंदमानच्या करावासातून केली आणि मृत्युंजय होऊन त्या नरकातून बाहेर पडल्यावर हिंदुमहासभेचे नेतृत्व करताना आणखी उत्कटतेने केली. अश्या अखंड हिंदुराष्ट्राचे स्वप्न बघणाऱ्या आणि जनतेला दाखवणाऱ्या राष्ट्रनायक आणि आमच्या हृदयातील भारतरत्न स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांस कोटी कोटी वंदन करून येथेच विरमते.



This is an amazing 'illusion'
It looks like a person reading, while 'sitting' on the water surface but it's just 'Stones' in the river.




Visionary leadership Of Datar Bros ... Hrishikesh and Rohit

The empire created by Dhananjay Datar as a Masala King, over a period (established in 1984 ) is well known and pride of Datars ... ADIL is the name in UAE to be recognized

For the Youngsters, Hrishikesh and Rohit, Joining The company was not a Brainer ... however Dhananjay Ji was absolutely clear that the new generation should have their own identity and they must learn from the scratch. Hence the brothers journey started at the age of 13 onwards by being at the shop and observing and learning thru practical and customer experiences.

Self-learning and being curious helped in having a thorough knowledge of the products, business and customer psychology. Name Adil as picked up by Grandfather, means " Justice " and " a Good man " was not only to be preserved but to ensure that values and tradition is maintained. The identity was to be maintained but at the same time Transfer of ideas and Leadership was to be showcased.

The Growth is The Only Constant ... was a tag line with advent of Digital AGE ... The brothers therefore embarked upon a new approach and new generation thought process while keeping the VALUES in tact for ADIL

Their involvement and approach in furthering the business was with a knowledge gathering and positive approach as how a NO has to be converted to YES. The Parental guidance and encouragement in establishing as a young business entrepreneurs was a perfect way as not to allow to have a father's success as a HIGH-HANDED approach.

Both feel that they are rather very fortunate to have such tough but encouraging environment to establish themselves and prove their worth. They feel That they are still too far away in having or guiding others, but at the same time, they would be happy to share and interact with Young Datars ( as and when there is an opportunity) and share failures and or success experiences.

Interactions and communication with Datars will be one of the interesting and enriching experience where they may gain a good knowledge and insights about the Business opportunities and its pitfalls. They wish that datar Kul Mandal will offer them an opportunity and platform to have an effective communication with Datars.

The flavour of success

# व्हाट्सएप ट्रॅप




रविवारची मस्त सकाळ. आजचा दिवस आरामात घालवायचा, असा विचार करून दामिनी कॉफीचा मग हातात घेऊन न्यूज पेपर वाचत बसली होती. अचानक तिची नजर एका बातमीवर स्थिरावली.

द्वेषपूर्ण, आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित केल्याबद्दल व्हाट्सअप ग्रुप ॲडमिन ला अटक

लक्षपूर्वक तिने ती बातमी वाचली. ज्या ग्रुप ॲडमिन ला पोलिसांनी काही व्हॉट्सॲप वापरकर्त्यांच्या तक्रारीवरून अटक केली होती, त्याचं नाव वाचून ती चक्रावली. आयुष अजय सिंघवी ???

आयुष, तिची मैत्रिण अश्विनीचा बावीस वर्षांचा तरुण मुलगा. दामिनी आयुषला लहानपणापासून अगदी जवळून ओळखत होती. अत्यंत साधा, सरळ, अभ्यासात हुशार असलेला आयुष असं काहीही करणार नाही, त्याला नक्कीच कोणीतरी यात अडकवलं असणार, याची तिला खात्री होती. दामिनीने अश्विनीला कॉल केला.

''हॅलो ! दामिनी, अगं, आयुला काल काहीही कारण नसताना पोलीस घेऊन गेले...''
''अश्विनी ! मला एक फोन तर करायचास...''
''मला काही सुचतच नाहीये ग...''
''बरं...तू कोणा वकिलाचा सल्ला घेतलास का ?''
''हो.. ॲड सचिन देशमुख त्याला जमीन मिळवून देण्याच्या प्रयत्नात आहेत. पण नेमकी आज सुट्टी आहे कोर्टाला... बिचारा माझा आयुष... त्याला पोलिसांनी मारलं वगैरे तर नसेल ना ग??''
एव्हढं बोलून अश्विनी रडायला लागली.
''शांत हो आशू... मी सचिनशी बोलते... आयुषला काहीही होणार नाही.''

अश्विनीची समजूत काढून दामिनीने फोन बंद केला आणि लगेच ॲड. सचिनला कॉल लावला.
सचिन ! मला आयुषच्या केसचे डिटेल्स सांगशील का?

''हो...काही लोकांच्या तक्रारींची दखल घेऊन, पोलिसांनी आयुषला माहिती तंत्रज्ञान कायद्या च्या ६७ कलमाखाली अटक केली आहे. तक्रारदारांनुसार आयुष ज्या व्हाट्सअप ग्रुपचा ॲडमिन आहे, त्या ग्रुप वरून द्वेषपूर्ण, आक्षेपार्ह आणि धार्मिक तेढ निर्माण करणारी पोस्ट गेल्या तीन-चार दिवसांपासून व्हायरल झाली आहे.''

''ओह !! आयुष चा मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केला असणार. माझ्यासोबत पोलीस स्टेशनला येतोस का ? त्याच्या फोनचं ॲनालिसिस करायला मिळालं तर यातून काही तरी मार्ग निघेल.''
''हो... लगेच नाही, पण दोन अडीच तासात पोलीस स्टेशनला ये... मी तिथे पोहोचतो...''
''ठीक आहे...''

दामिनी ने फोन बंद केला. दोन तासांत पोलीस स्टेशनला पोहोचायचं होतं. तिच्या हातात तासाभराचा वेळ होता. तेवढ्या वेळात तिने आयुषचे सोशल मीडिया हँडल्स ॲनालाइज करायचे ठरवले. लॅपटॉप उघडून तिने आयुष सिंघवी चे फेसबुक, इंस्टाग्राम आणि ट्विटर अकाउंटचे सोशल मीडिया ॲनालीटीक टूल द्वारे परीक्षण केले. या प्रकारच्या ॲनालेसिस मुळे त्या व्यक्तीची मानसिक अवस्था बऱ्याच प्रमाणात जाणून घेता येते. जसं की ती व्यक्ती उदासीन, अस्वस्थ, रागीट आहे की संतुलित स्वभावाची आहे? त्या व्यक्तीच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक धारणा, मतं काय आहेत ?? वगैरे...

सोशल मीडिया ॲनालेसिस वरून तरी आयुष एक संतुलित व्यक्तिमत्वाचा तरुण आहे, यावर शिक्कामोर्तब झालं.

दामिनी आणि सचिनच्या विनंतीवरून पोलिसांनी आयुषच्या मोबाईल फोनची क्लोन्ड (cloned) कॉपी त्यांना तिथं बसून चेक करण्याची परवानगी दिली.

सायबर गुन्हा घडल्यानंतर, डिजिटल फॉरेन्सिक्स करताना ओरिजनल डिव्हाईस (या केसमध्ये मोबाईल फोन) जसाच्या तसा preserve करून त्याची क्लोन कॉपी तयार केली जाते. आणि संपूर्ण इन्वेस्टीगेशन त्या कॉपी वरच केलं जातं. ओरिजिनल डिव्हाईस मधील डेटा राखून ठेवला जाऊन त्याची एक हॅश की तयार केली जाते. 'हॅश की' म्हणजे एखाद्या मेमरीचे युनिक सिग्नेचर असतं. त्यामुळे कोर्टात ते डिव्हाईस पक्का पुरावा म्हणून सादर करता येतं.

दामिनीने आयुष च्या मोबाईलची क्लोन कॉपी तपासायला सुरुवात केली. बरेच व्हाट्सअप ग्रुप्स दिसत होते. तिचे लक्ष एका व्हाट्सअप ग्रुप ने वेधून घेतले. अमेझिंग वर्ल्ड असे त्या ग्रुपचे नाव होते. त्या ग्रुपमधील बरेच नंबर्स पाकिस्तानी आणि बांगलादेशातील होते. त्या ग्रुपमध्ये बऱ्याच लिंक्स पोस्ट केलेल्या दिसत होत्या. पण आश्चर्य म्हणजे त्या लिंक्सवर आता कुठलेही कन्टेन्ट दिसत नव्हते.

सुदैवाने इतर कुठल्याही ग्रुप मध्ये कुठलीही आक्षेपार्ह पोस्ट नव्हती. अमेझिंग वर्ल्ड या व्हाट्सअप ग्रुप मधील मेंबर्सचे नंबर्स नोट करून घेऊन दामिनीने सचिन सोबत आयुष ला भेटायचं ठरवलं.

''तुझ्या अमेझिंग वर्ल्ड या व्हाट्सअप ग्रुप मधल्या बऱ्याच मेम्बर्स चे नंबर पाकिस्तानी आणि बांगलादेशी आहेत. तू या सगळ्यांना ओळखतोस का?''
तिने आयुषला विचारले.
''नाही, मी कोणालाच ओळखत नाही.''
''मग तू त्यांना ग्रुप मध्ये का ॲड केलं ?''
''मी नाही कोणाला ॲड केलं. कोणीतरी मला या ग्रुपची इन्व्हाईट लिंक पाठवली. नावावरून ग्रुप इंटरेस्टिंग वाटला. म्हणून त्या लिंकवरून मी ॲड झालो. त्यात झूलॉजी आणि जिओलॉजी विषयांवरील व्हिडीओज च्या लिंक्स पोस्ट व्हायच्या. त्या मी बऱ्याच वेळेस फॉरवर्ड केल्या आहेत.''
''अरे, पण तू तर त्या ग्रुपचा ॲडमिन आहेस ना ?''
''त्या ग्रुपमध्ये मी एकटाच ॲडमिन नाहीये मावशी, बाकी अजून दोन-तीन ॲडमिन आहेत.''
दामिनीने त्या ग्रुप मधील विदेशी नंबर्सचं बऱ्याच वेळेस, व्यवस्थित ॲनालेसिस केल्यावर, तिच्या लक्षात आलं, आयुष क्रॉस बॉर्डर सोशल इन्फ्लूयून्सर ग्रुपमध्ये ट्रॅप झाला आहे.

आपल्या शेजारील देशातील काही समाजकंटक हे टेक्निक वापरून आपल्या देशातील काही लोकांमध्ये प्रभाव किंवा धार्मिक तेढ निर्माण करण्याच्या प्रयत्नात असतात. यासाठी व्हाट्सअप सारख्या सोशल मीडियाचा वापर योजनापूर्वक केला जातो. सोशल मीडियावर आधी एक ग्रुप तयार करून त्यात काही भारतीयांना इन्व्हाईट लिंक द्वारे ॲड केलं जातं. सुरुवातीला मनोरंजक लिंक्स, व्हिडिओज आणि मेसेजेस द्वारे ॲड झालेल्या मेंबर्सना ग्रुपमध्ये राहण्यास भाग पाडलं जातं. ॲड झालेल्या मेंबर्सना पाठवलेल्या व्हिडिओ लिंक्स मध्ये ग्रुपची इन्व्हाईट लिंक एम्बेड केली (लपवली) जाते. त्या मेंबरने ती

लिंक फॉरवर्ड केल्यास इतर लोकही इन्व्हाईट लिंक द्वारे अशा ग्रुपमध्ये येतात. काहीजण quit होतात. काहीजण फारसा विचार न करता ग्रुपचे मेम्बर बनून राहतात.

हे समाजकंटक मालवेअर लिंक्स पाठवून मोबाईल देखील हॅक करतात. त्याद्वारे ब्लॅकमेल करतात. सुरुवातीला मनोरंजक पोस्ट ग्रुप वर येतात. नंतर त्यातच छुप्या लिंक्स एम्बेड करून धार्मिक तेढ वाढवणारा, आक्षेपार्ह कंटेंट शेअर केला जातो आणि ह्या ग्रुप द्वारे व्हायरल केला जातो.

या क्रॉस बॉर्डर ग्रुपच्या कोणा समाजकंटक मेंबरने, जाणीवपूर्वक, आक्षेपार्ह कंटेंट एम्बेड करून, कुठलीतरी, वरकरणी माहितीपूर्ण वाटणारी पोस्ट टाकली होती. पोस्ट टाकून हा समाजकंटक संगनमताने इतर मेंबर्स सोबत ग्रुप मधून बाहेर पडला होता. बाहेर पडणाऱ्यां मध्ये इतर ॲडमिन देखील होते. त्यामुळे आयुष एकटाच ग्रुपचा ॲडमिन म्हणून ट्रॅप झाला होता.

आयुषने मनोरंजक व्हिडिओ समजून ती पोस्ट इतर ग्रुपमध्ये फॉरवर्ड केली होती. त्या पोस्टमध्ये लपलेली, धार्मिक तेढ निर्माण करणारी, आक्षेपार्ह कंटेंटची लिंक एक्सेस झाल्याने, त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यात आली होती.

दामिनीने या सगळ्या ॲनालेसिस चा एक रिपोर्ट तयार करुन, जरुरी ते स्क्रीनशॉट्स त्याला जोडले आणि तो रिपोर्ट ॲड. सचिन देशमुख च्या हवाली केला. त्या ॲनालेसिस/रिपोर्ट च्या आणि इतर पुराव्यांच्या आधारे आयुषची या गुन्ह्यातून निर्दोष सुटका झाली.

वरील सत्यघटनेवर आधारित कथेवरून सोशल मीडिया वापरकर्त्यांनी काही गोष्टींची काळजी घेणे जरुरी आहे. अनोळखी लिंक्स क्लिक करणे टाळावे.

अनोळखी ग्रुप मध्ये सामील होऊ नये.

कॉन्टॅक्ट लिस्ट मधील व्यक्तीं शिवाय कोणीही आपल्याला कुठल्याही ग्रुपमध्ये ॲड करू शकणार नाही अशी सेटिंग करावी.

चुकून जरी अशा एखाद्या अनोळखी ग्रुप मध्ये ॲड झाल्यास लगेच बाहेर पडावे.

सजग आणि सुरक्षित राहून टेक्नॉलॉजीचा आनंद घ्या.

आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत...

**– कविता कुलकर्णी दातार**



नेत्र तुझे लडिवाळ
ओठी हसू मोहक
सरी मोतियांच्या रुळती
रेशमाचा केशकलाप

देवकीचा तू रे तान्हा
यशोदेचा कान्हा झाला
साऱ्या गोकुळा चा जीव
तुझ्यासाठी वेडावला

किती दुष्ट संहारीले
किती सुष्ट तारियेले
निरालस देखणे रूप
कुब्जेलाही तूच दिले

विश्वरूप दर्शनाने
रणी अर्जुना उद्धरीले
कर्म, फळ, अभिलाषा
गीता सूत्रात बांधले

पण आता जग सारे
मार्ग शांतीचा विसरले
हव्यासाच्या बाजारात
मन भरकटू लागले

नाती गोती मैत्रीचे
रेशीमबंध तुटू लागले
विश्वास, लाज, अब्रूचे
लक्तर वेशीवर टांगले

धाव घे कृष्णा आता
तुझी फार गरज आहे
नंतर खूप उशीर होईल
विनाशाची दरी जवळ आहे

– माधुरी दातार

# एका माहेरवाशीणीचे मनोगत कवितेतून मांडण्याचा छोटासा प्रयत्न..

एका माहेरवाशीणीला अजून काय हवे?

लेक आहे एकुलती एक
मग काय एकुलत्या एक माहेरवाशीणीचे लाड करायला आहेत अनेक
आई–बाबांच्या मनावर हिचेच राज्य
तिच्या व्यातिरिक्त आईबाबांचे करायला कोण बरं सज्ज?
एका माहेरवाशीणीला अजून काय हवे?

आई बापाच्या दोन लेकी
जणू भाद्रपदी येणाऱ्या ज्येष्ठा कनिष्ठा गौरी
त्यांना हवी फक्त मायेची सावली
जेव्हा जेव्हा येती माहेरा घेऊनी आनंद
त्यांच्या सानिध्यात मिळेल साऱ्यांना परमानंद
एका माहेरवाशीणीला अजून काय हवे?

आई, नको घालू पुरणपोळीचा घाट
घावन घाटले केले तरी होईल आमचा थाटमाट
असे सांगत करतायत आईचा ताण कमी
तेवढाच मिळेल गप्पांना वेळ
खेळू बदामसात अन् रमी
एका माहेरवाशीणीला अजून काय हवे?

आई वडिलांची ती लेक
सोबत भाऊराया एक
नांदे सौख्य भरे वाहिनीसमवेत
अशा माहेरवाशिणीची गोष्टच न्यारी
त्यात भाचरंडे आहेत लय भारी
एका माहेरवाशिणीला अजून काय हवे?

येता माहेरा बघून स्मितहास्य साऱ्यांच्या वदनी
होईल ती तृप तृप्त मनभरूनी
कुलदेवतेस प्रार्थे, होवो कुशलमंगल ह्या साऱ्यांचे
अजून काही नाही ध्यानी मनी.
सर्वांचा आनंद ती डोळे भरून पाही.
सासरी जाता जाता म्हणे मला अजून नको काही.
एका माहेरवाशीणीला अजून काय हवे?

सर्व माहेरवाशीणींना समर्पित

**– सौ. मिनल दातार आगाशे**




## अरे मना, सज्ज ना ?

जीवनातील नकारात्मक विचारांना सहजपणे मात देणारा रामबाण उपाय म्हणजे श्री समर्थ रामदास स्वामी यांची ग्रंथसंपदा होय.

या ग्रंथसंपदेतील ओवीरुपी-श्लोकरुपी कुठलंही फुल उचलावं आणि कृतकृत्य व्हावं असा अगाध महिमा.

बहु हिंडता सौख्य होणार नाही
शिणावे परी नातुडे हित काही
विचारे बरे अंतरा बोधविजे
मना सज्जना राघवी वस्ती किजे ।।

आजच्या गुगलरुपी अफाट माहितीच्या महाजालात अंतर्मुख होऊन चिंतन घडत नाही तोपर्यंत आपलं हित नेमकं कशात आहे उमगणं निव्वळ अशक्य आहे.

सुखी होतो खबरदार
दुःखी होतो बेखबर ।।

म्हणूनंच तूम्हा-आम्हाला जगताना alert आणि proactive रहायला श्रीसमर्थ सांगतात.

अचूक यत्न करवेना
म्हणौन केले ते सजेना
आपला अवगुण जाणवेना
काही केल्या ।।

जर आपल्या कर्मांतून अपेक्षित outcome आला नाही तर नक्कीच ''बन चुके'' या भुमिकेच्या बाहेर येत आपण कुठे कमी पडलो? याचा शोध घेणं भागंच आहे अन्यथा प्रगती साधणं अवघड जाईल.

येक शीत चांचपावे
म्हणिजे वर्म पडे ठावे
तैसे थोड्या अनुभवे
बहुत जाणावे ।।

प्रसंगभान लक्षात घेतलं की मग काय आणि किती बोलावं, त्यातून कसं वागणं अपेक्षित आहे हे लगेचंच समोर येतं.

मेळविती तितुके भक्षिती
ते कठीणकाळे मरोन जाती ।।

म्हणून वाह्यात खर्चांवर नियंत्रण ठेवत Savings ही असायलांच हवीत अन्यथा महागाई अथवा अन्य कोणत्याही प्रासंगिक आपत्ती उद्भवल्या तर त्यांचे व्यवस्थापन कसे करणार?

विचारुनी बोले विवंचून चाले
तयाचेनि संतप्त तेही निवाले ।।

समाजमनातील क्षोभ हा परिपक्वतेनेंच क्षमवावा लागतो. अशावेळी घेतलेली नम्र भूमिकांच परिणामकारक ठरते.

जगी पाहता साच ते काय आहे
अति आदरे सत्य शोधून पाहे ।।

सरतेशेवटी या जीवनात कायमस्वरुपी टिकणारं असं काहीच नाही जे जाणून आपली इर्षा-महत्वाकांक्षा आवश्यक तिथे म्यान करावी आणि आहे त्या क्षणांचा भरभरुन आनंद घ्यावा.

देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी
मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।।

निव्वळ आपली कर्मेच मागे उरणार आहेत हे उमगून आपल्या चालण्या-बोलण्यात, कार्यशैलीमध्ये अंतरापासून गोडवा असावा, असा श्रीसमर्थांचा स्पष्ट निवाडा आहे.

शुकासारिखे पुर्ण वैराग्य ज्याचे
वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे
कवी वाल्मीकासारिखा मान्य ऐसा
नमस्कार श्री सद्गुरु रामदासा
जय जय रघुवीर समर्थ ।।

– **श्री. व्यंकटेश अशोक दातार, पुणे**

# स्त्री, स्त्रीत्व आणि व्यावसायिक कारकीर्द



स्त्री हा विषय आला कि आजच्या घडीला स्त्रियांनी किती वेगवेगळ्या क्षेत्रात किती प्रगती केली आहे, त्या कश्या कुठल्याही क्षेत्रात कमी पडत नाही, त्यांचे हक्क, त्यांचा अभिमान-मानसन्मान इत्यादी गोष्टींवर भरपूर लिहिले जाते, बोलले जाते. ते चांगले ही आहेच. स्त्रिया कुठल्याही क्षेत्रात कुठल्याही पद्धतीचे काम करू शकतात हि चांगलीच गोष्ट आहे कारण स्त्री-शक्तीचं रूपच त्यातून दिसतं. पण मुद्दा हा आहे कि प्रत्येक स्त्रीने व्यावसायिकदृष्ट्या इतकी प्रगती करण्याची गरज आहे का?

आपल्या काही जुन्या पिढ्यांकडे पाहिले तर असं लक्षात येईल कि बाहेर जाऊन काम करून पैसे कमावणे हि जवाबदारी पुरूषच सांभाळत. पण स्त्रिया घर सांभाळताना सुद्धा अनेक गोष्टींकडे लक्ष देत होत्या. म्हणूनच स्त्री स्वतःच एक शैक्षणिक संस्था आहे असे म्हंटले जायचे. कारण दैनंदिन कामातून संस्कृती जपणे, मुलांचे संगोपन करणे, त्यांना माणूस म्हणून घडवणे, पूजा-अर्चा व्रत-वैकल्पे यातून देव-धर्म जपणे, असलेल्या पैशात घरचे व्यवहार सांभाळणे, वडीलधाऱ्यांचे मान-सन्मान जपणे, त्यांच्या आजारपणात करावी लागणारी शुश्रुषा हि सर्व जीकरीची कार्ये त्या उत्तम प्रकारे पार पाडत होत्या. फक्त त्याला हवे तेवढे सामाजिक स्तरावर महत्व मिळत नव्हते किंवा या गोष्टी गृहीत धरल्या जात होत्या. नंतर काही कारणांमुळे जसे मुलं असलेल्या विधवा महिला, घटस्फोटीत महिला, ज्यांच्या घरी पुरुष मंडळी काम करायला नाहीत, किंवा बिकट परिस्थितीत घराला हातभार म्हणून महिलांनी घराबाहेर जाऊन कामे करायला सुरवात केली. सुरवातीला या महिलांचे व्यवसाय मात्र घरगुती पद्धतीत मोडणारे होते. जेवणाचे डबे करून देणे, शिवणकाम, विणकाम, खाण्याचे पदार्थ इत्यादी. मग त्यांना शिक्षणाचे महत्व कळू लागले. शिक्षणामुळे अधिक मिळकत मिळेल या दृष्टीने मुलींच्या शिक्षणावर भर दिला गेला. त्यांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी प्रोत्साहन दिलं गेलं. आणि पुढच्या पिढीतील महिला उच्च शिक्षण घेऊ लागल्या. त्यामागून मिळणारे पैसे, नाव आणि समाजात मिळणारा मान ह्यामुळे पुढच्या पिढीला हि एक गरजेची बाब वाटू लागली. तरी हि त्या काळातील स्त्रिया सगळी घराची कामे करून आणि एकत्र कुटुंब पद्धतीत राहून, सासू-सासरे आणि बाकी नाती जपून हि नोकरी-व्यवसायाची जवाबदारी पार पाडत होत्या. याची दोन महत्वाची कारणे म्हणजे त्यावेळी असलेलं कामाचं स्वरूप आणि एकत्र कुटुंब पद्धती.

पण जसजसा काळ पुढे सरकत गेला कामाचं स्वरूप बदललं. शिक्षण, पैसा, समाजात मिळणारा मान, वाढत चाललेली महत्वाकांक्षा आणि त्यातून येणारा अहंकार, स्वतःस हवे तसे राहण्यासाठी, वागण्यासाठी, हौस-मौज करण्यासाठी उपलब्ध असलेला पैसा आणि उपलब्ध असलेले पर्याय ह्यामुळे सारं चित्र हळूहळू बदलत गेलं. विभक्त-कुटुंब पद्धती तयार होऊ लागल्या आणि त्यातून दुरावे निर्माण झाले. बिकट परीस्थितीच्या वेळी हातभार लावणारे हात अहंकारामुळे छाटले गेल्याने गरजेच्या वेळी लागणारी अधिक पुंजी साठवण्यासाठी अजून काम आणि त्यातून मिळणारा अधिक पैसा याची गरज वाढली. वाढणारी महागाई, ढासळत चाललेली शारीरिक क्षमता, वाढत चाललेला शिक्षणाचा खर्च, मुलं सांभाळण्याची जवाबदारी, त्यांना देण्यासाठी अपुरा पडणारा वेळ हे सगळं वाढत गेल्याने घरातील मुलांची संख्या आपोआपच कमी होऊ लागली. त्यात अजून भर म्हणजे फॅशनच्या नावाखाली बदलत चाललेले राहणीमान व त्यासाठी करावी लागणारी अमाप खरेदी, दाग-दागिन्यांचा - रंग - रंगोटीचा मुखवटा, त्यातच सोकावलेला स्त्री मुक्तिवादाचा उदोउदो नी ह्या मृगाजळाकडे जाणाऱ्या स्त्रियांची वाढत जाणारी संख्या, अभिमान-अहंकार, पत-प्रतिष्ठा आणि त्यामुळे वाढत चाललेली व्यसने, प्रलोभने इत्यादींमुळे भारतीय संस्कृतीचा केंद्रबिंदू असलेली स्त्रीच हरवली, घराबाहेर पडली  आणि त्यामुळं आपली संस्कृतीच ढासळायला लागली  असं म्हणायला हरकत नाही. स्त्रीच स्त्रीत्वच कुठेतरी लोप पावलं.

आज मुंबई सारख्या शहरात राहणाऱ्या मध्यम वर्गीय स्त्रीचा विचार करू. कारण ह्या श्रेणीतील महिलांची संख्या आणि वर मांडलेल्या प्रश्नाचा संबंध येथे जास्त आहे. अशी स्त्री विभक्त कुटुंबात राहणारी, किंवा फारफार तर सासू-सासऱ्यांबरोबर राहणारी आहे, जी घरातील थोडीफार कामे करून नोकरी करते. ह्यातील बऱ्याच स्त्रियांना अगदी तीन महिन्याच्या मुलाला घरातील वडीलधाऱ्या मंडळींकडे सोपवून नोकरीवर जाणे भाग पडते. त्यांच्या भविष्यासाठी झटताना त्यांच्या वर्तमानावर घाला घातला जातो. साधी उदाहरणं पहायची म्हटलं तर दोन्ही वेळेचा स्वयंपाक सकाळीच करणे किंवा स्वयंपाकाला बाई ठेवणे, मुलांना अंगावरच दुध न देता बाटलीतून दुध देणे, त्यांचे रडणे गप्प करण्यासाठी सोप्पा मार्ग म्हणून मोबाईल हातात देणे, अभ्यास घ्यायला वेळ मिळत नाही म्हणून दूसऱ्या इयत्तेपासूनच शिकवणीला पाठवणे, आठवड्याच्या आठवड्याला मुलाबरोबर वेळ घालवायचा म्हणून त्याला मॉलमध्ये फिरायला घेऊन जाणे, रात्री जागून मुलाचा अभ्यास घेणे, अश्या अनेक तडजोडी केल्या जातात. घरातील काम, नोकरी - व्यवसाय आणि स्वतःच्या अशा-आकांक्षा, हौस-मौज, खरेदी हे सगळं सांभाळता सांभाळता तारेवरची कसरत करावी लागते. ह्यात आपण कुठे कमी तर नाही न पडत अशी मनाला सतत लागलेली कुणकुण, आणि तरी हि ते कोणाला दिसू नये - समजू नये म्हणून चढवला जाणारा मुखवटा याने मन:शांती हरवते आणि त्याचा परिणाम तिच्या बरोबरच पूर्ण कुटुंबावर होत असतो. पण ह्या गोष्टींवर विचार करताना किंवा त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करताना सहसा कोणी दिसत नाही. मुळात हा एक महत्वाचा प्रश्न आहे हेच मुळी कोणाला मुख्यत्वे स्त्रियांना मान्य आहे का? मुळात पत-प्रतिष्ठा, मोठ्या पगाराची नोकरी, समाजात कर्तुत्ववान स्त्री  म्हणून मान मिळवायची अपेक्षा ह्या गोष्टी स्त्रीच्या सर्वांगीण विकासाचा, स्त्री-शक्तीचा मापदंड ठरतात का? यावर विचार करण्याची गरज आहे.

सध्याच्या काळात मुलांच्या शिक्षणाचा होत चाललेला ऱ्हास, त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, त्यांच्या गरजेचे पौष्टिक पोषण ह्या सगळ्या गोष्टी पुरवायच्या असतील तर पालकांपैकी एकाने तरी घरात जास्त वेळ देणे गरजेचं आहे. अर्थातच स्त्री आणि आई म्हणून हि जवाबदारी महिलांवर अधिक प्रमाणात येते. पुरुषांनी त्यांच्या अर्धांगिनींना यात साथ देणे हे ओघाओघाने आलेच. त्यांनी सुद्धा महिलांना गृहीत न धरता त्यांच्यावर प्रेम, विश्वास ठेऊन आणि त्यांचा योग्य तेवढा आदर करून त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे पुरुषांचे काम आहे.

ह्यातून मार्ग काढायचा तर स्त्रियांनी नोकरी करणे सोडून द्यावे हा उपाय हल्लीच्या काळात मान्यही होणार नाही आणि तो व्यवहार्यही ठरणार नाही. याला अनेक कारणे आहेत. पण मग यातून मार्ग काढण्यासाठी काय करता येईल हे पहायला हवं. यात सर्वात जास्त योगदान हे कॉर्पोरेट कंपन्या करू शकतील असं मला वाटतं. कंपन्यांनी स्त्रियांसाठी flexible timing, alternate day working, half-day working, work from home अश्या प्रकारच्या कामांचे पर्याय जास्तीतजास्त प्रमाणात उपलब्ध करून दिले तर बराच फरक पडेल. करोनाकाळापासून तर अशा सुविधा सहज उपलब्ध होऊ शकतात हे सर्वांनाच कळले आहे. कंपन्यांनाही कमी पगारात कर्मचारी मिळतील आणि स्त्रियांना घरातील जवाबदाऱ्या पार पाडून काम करता येईल. कॉर्पोरेट सोशल रीस्पोंसिबिलीटी च्या अन्वये अनेक कामे करताना आपल्याच कार्यालयातील स्त्रियांचाही विचार करून या पद्धतीने सोयी उपलब्ध करून देणे हा एक उपक्रम करता येऊ शकेल असे वाटते; जे सर्वांच्याच हिताचे असेल. कारण पगारापेक्षाही हल्ली वेळ महत्वाचा आहे. पूर्ण वेळ ऑफिसमध्ये बसून घराची काळजी करण्यापेक्षा  हा एक पर्याय असू शकतो जेणे करून घरीही वेळ देता येईल आणि नोकरीही सांभाळता येईल. त्याच बरोबर स्त्रियांनीही कुठल्या गोष्टीला किती महत्व द्यायचे, दुसरी करते तर मी पण करणार असे अट्टाहास बाजूला ठेवणे, व्यसनं आणि प्रलोभनांपासून लांब राहणे गरजेचे आहे. मोहजालाच्या मागे न धावता आपली लक्ष्मणरेषा आपणच आखणे गरजेचे आहे.

तसं हि भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे मनुष्याचं आद्य (पाहिलं) कर्तव्य काय त्याप्रमाणे कर्म करणे गरजेचे असते. त्यामुळे एक स्त्री म्हणून आणि नंतर एक आई म्हणून आपली आद्य कर्तव्ये पार पाडणे हे प्रथम कर्म आणि बाकी सगळी दुय्यम कर्म हे ध्यानात ठेवले तर मन:शांती नक्कीच मिळेल. भारतीय संस्कृती जपायची असेल तर याचा विचार आणि कृती आत्मसात करणे नक्कीच एक माइलस्टोन असेल.

– वेदवती दातार



# श्री



काल माझ्या स्वप्नात
गणपती बाप्पा आला
येतोय मी थोड्याच दिवसात
असं म्हणाला! ।।ध्रु।।

काय मग कशी चालू आहे तयारी असही विचारत होता
जास्त काही करू नको फक्त मनापासून भक्ती कर अस
म्हणत होता ।।१।।

जमल तर इतकंच कर
माझ्या आवडीचे खरं खरं लाल जास्वंद फुल, केवडा
आणि कमळ मात्र मला नक्की अर्पण कर
नको ती प्लॅस्टिकची फुलं आणि हार
त्यापेक्षा चार अक्षता वाहा ते होईल छानच फार ।।२।।

हिरव्यागार आरोग्यदायी दूर्वा देखील आण!
नैवेद्यात काय करशील ते ही सांग
नारळ गूळ सारणाचे उकडीचे मोदक कर
त्यावर छानशी साजूक तुपाची धार धर
पंचखाद्य, लाडू, पेढे मला खूप प्रिय
प्रसादात ह्यांचेही स्थान अद्वितीय।।३।।

सांगा माझ्या चार गोष्टी घेऊनी बालगोपाळा संगे
कळू दे त्यांनाही माझी सर्व अंगे
पुजूनी शाडूचीच मूर्ती द्या त्यांनाही पर्यावरणाचे धडे
नैसर्गिक आरास मलाही नित्य आवडे ।।४।।

ढोल ताशा लेझिम हि वाद्ये मला प्यारी
करा माझे कान तृप्त त्यांच्या स्वरांनी
नका सोडू मात्र मला भंडावून त्या DJ नी
ह्याच साठी केला होता का अट्टाहास लोकमान्य टिळकांनी
थोडासा करा विचार पटेल तुम्हालाही मनोमनी ।।५।।

करा हौस तुम्हा हवी ती नको नुसता नखरा
डोक्यावर बर्फ मुखी साखर ठेऊन
उत्सव करा माझा साजरा ।।६।।

देईन तुम्हाला आशीर्वाद भरभरून मी
सुखकर्ता मी दु:खहर्ता मी
येतोय तुमच्यापाशी लवकरच मी ।।७।।

पहाटे स्वप्नातून जागी झाले
स्वप्न सरले, नेत्र झरले, ओठ आपोआप उद्गारले
गणपती बाप्पा मोरया
तुझ्या आगमनासाठी मन आतुरले गणराया।।८।।

– सौ. मिनल दातार आगाशे



# निशिगंध

देठा देठा मधून उमलला
शुभ्र पांढरा कोमल हळवा
नाजूक साजुक किती साजिरा
निशिगंध तो रंग बावरा

हिरवी पाने पराग पिवळे
फूल लाजरे कसे फुलले
फूलता फूलता हळूच त्याने
उंची अत्तर हवेत सांडले

रात्रीच्या त्या निवांत वेळी
रजनीगंधा अशी बहरली
तसेच उमलत गेले सारे
क्षण कातर काहीसे गहीरे

स्वप्ने रंगीत मने कोवळी
अशीच होती कधी उमलली
आज अचानक फिरून आली
सय जुनी ती पुन्हा परतुनी

भासआभास हे सारे खोटे
तरी मनोमन होतो धुंद
रोज असाच बहरतो तो
गंधवेडा खुळा निशिगंध

– माधुरी दातार



# प्रेम



प्रेम म्हणजे...
अनेक नाती अनेक रूपं,
जो तो आपल्यापरीने
बघतो तयाचे स्वरूप।

कधी नजरेतून बोलणं
तर कधी नजर चोरणं,
कधी प्रेमगीते बहू
तर कधी अबोला धरणं।

कधी गुलाबाची कळी
तर कधी गीफ्ट छोटंमोठं,
न मिळता प्रेमभेट
ते रूसणं खोटं खोटं।

कधी चिंब भिजणं तर
कधी दोघांत एक छत्री,
कधी गुलाबी थंडीत
दोघांना एकाच शालीची मिठी।

कुणासाठी स्वातंत्र्य
तर कुणासाठी परावलंबन,
कुणासाठी असतं हे
साताजन्माचं बंधन।

कुणाची हसवणूक
तर कुणाची फसवणूक,
कुणाचे जीवनध्येय तर
कुणाची नूसतीच करमणूक।

कुणाच्या मनात असतं
पण वागण्यात दिसत नाही,
कुणाच्या वागण्यात दिसलं तरी
मनात असतंच असं नाही।

कधी पर्णावरील थेंबांसारखं
झरकन झुरून जाणारं,
कधी पागोळीच्या पाण्यासारखं
मनात ऊरून राहणारं।

कथा आगळी वेगळी
परि अडीच अक्षरांची,
जणु दोन जीवांमधील
एका हृदयाची।

– वेदवती दातार

# Interesting references to name DATAR

COMPILED By : Dhananjay Vijay Datar

## Datar Kaur

Name Datar used in year 1801 ...among Sikh Empire

Maharani Datar Kaur (born Bibi Raj Kaur Nakai; (c. 1784– 20 June 1838) was the queen consort of Maharaja Ranjit Singh, the founder of the Sikh Empire and the mother of his successor, Maharaja Kharak Singh. She was the daughter of Sardar Ran Singh Nakai, third ruler of the Nakai Misl and Sardarni Karmo Kaur.

**WHY NAME DATAR ?**

Since Raj Kaur was the name of her mother-in-law, as well as Ranjit Singh's aunt the daughter of Charat Singh and Desan Kaur; To avoid confusion, the wife of Ranjit Singh, Raj Kaur Nakai was given the name **"Datar"** (ਦਾਤਾਰ) (داتار) which means 'Giver', due to her maternal gentleness and understanding in dealing with the wayward Ranjit Singh.

## Datar :

a village in Indonesia.

Geography : It is located in the hills with an altitude of 200–860 meters. Its highest point is on Mount Ketra (860 m). Datar has a tropical climate with dry and rainy seasons. Daytime temperatures range from 23 - 31 degrees Celsius.

Tourism : **Datar** gained status as a Tourism Village in 2018, Among the attractions are Cimandaway Curug, Mount Ketra, Reong Curug, Cikawalon and Cidayeuh River, Singaraja Rice Fields, Gunung Datar Petilasan, Ngabeungkat Dawuan Culture and Sidekah Kupat, Batu Papangkuan, Ombyok Dadung Tradition Art, Injuk Industry and palm sugar.

## DATAR HILLS or DATAR PARVAT

Located near Girnar , Gujrath

Datar hills is a shrine of Saint Jamiyal Shah Datar, which is a popular place of worship for both Hindus and Muslims. The climb to the Datar hills is about 2500 steps or 847 metres (2,779 ft). Hills are bear to Junagadh City and Girnar Hills are also nearby attraction....

## SAIYED ALI MIRA DATAR RAHMATULLAH ALAIH

The Hazrat Saiyed Ali Mira Datar Dargah is in UNAVA VILLAGE located near Unjha , in Mehsana District of Gujrath , INDIA (on SH 41 . Mehsana , Palanpur ) this village is aprox 40 km from Palanpur

Millions of Devottes and followers visit this Dargah every year , who has a staunch belief that Dargah has all the cure for their sufferings and problems

A Hindu Poet named Shah Surath named Hazrat Saiyed Ali as **MIRA DATAR .**

The word Mira means the Brave one who loves the Human Race

Datar means Giver or Bestower ..

Since then Hazarat Saiyed Ali Mira is known as **DATAR**

### – जाहीर आवाहन –

**'दातार कुलवृत्त'** च्या पुढील आवृत्तीसाठी,दातार कुलमंडळ सदस्यांनी आपले यश, उपलब्धी, सन्मान, पुरस्कार (शक्य असल्यास छायाचित्रासह) तसेच स्वरचित कथा, कविता, लेख (इंग्रजी किंवा मराठी) ९४२२६०३९८४ या व्हॉट्सअप नंबरवर अथवा newsletter@datarkulmandal.com या ईमेलवर पाठवावे. असे विनम्र आवाहन करण्यात येत आहे.

– संपादक

### – जाहीर आवाहन –

कुलमंडळातील ज्या व्यक्तींनी अद्याप मंडळाचे सदस्यत्व घेतले नसेल, त्यांनी ते लवकरात लवकर घ्यावे ही नम्र विनंती. सदस्यत्वा साठीचा फॉर्म पुढील लिंकवर उपलब्ध आहे.
https://datarkulmandal.com/membership-form/

SCAN FOR FORM

– दातार कुलमंडळ

दातार कुलमंडळाच्या वतीने संपादक कविता कुलकर्णी दातार यांनी हे चातुर्मासिक दातार कुलवृत्त (ई न्यूजलेटर) शैलेश प्र. आघारकर यांच्या स्नॅप ग्राफिक्स, ०३, गणपती कृपा, पनवेल येथे तयार करून कुलमंडळाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केले आहे. सदरचे वृत्तपत्र हे खाजगी वितरणासाठी आहे. या न्यूज लेटर मध्ये छापलेल्या लेख, कविता, माहिती याच्याशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.